जनसंपर्क कक्ष
18 MAY 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘पुढारी’कार डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमालेत शनिवारी ॲड. उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘पुढारी’कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत निष्णात कायदेपंडित पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांचे शनिवार दि. २० मे रोजी सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन दसरा चौक येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

‘भारत आणि दहशतवाद’ या विषयावर ते या व्याख्यानमालेत आपले पुष्प गुंफणार आहेत. भारतापुढील दहशतवादाचे गंभीर आव्हान, त्यातील उपाय योजना अशा विविधस्पर्शी मुद्द्यांवर ते व्याख्यानातून आपले विचार मांडणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के हे व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान भूषवणार असून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

१९८८ साली ‘पुढारी’कार, पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सुरू करण्यात आली. या व्याख्यानमालेत यापूर्वी प्राचार्य शिवाजीराव भोसले, डॉ. य. दि. फडके, माधव गडकरी, पु. रा. बेहरे, विजय तेंडुलकर, अरुण शौरी, द. मा. मिरासदार, डॉ. अरुण निगवेकर, डॉ. यु. म. पठाण, अरुण साधू, अनंतराव पाटील, बाळासाहेब भारदे, कुमार केतकर, ले. ज. अर्जुन रे, प्रमोद महाजन, अविनाश धर्माधिकारी, यशवंतराव थोरात, जयंत नारळीकर, सदानंद मोरे, भालचंद्र मुणगेकर, हेमंत महाजन, माणिकराव साळुंखे, के. टी. पारनाईक, मिरा बोरवणकर, अरविंद गोखले, शशिकांत पित्रे, डॉ. नरेंद्र जाधव, अजित भोसले, डॉ. अनिल काकोडकर, भूषण गोखले, उदय माहूरकर यांनी व्याख्यानाचे पुष्प गुंफले आहे.

पुण्यनगरी

# ॲड. निकम यांचे २० रोजी व्याख्यान

कोल्हापूर : प्रतिनिधी

पद्मश्री ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ॲड. उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर हे व्याख्यान २० मे रोजी सायंकाळी ५ वाजता शाहू स्मारक भवन येथे होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत.

लोकमत

# विद्यार्थ्यांनी समजून घेतली 'जपानी-बोन्साय' कला

## विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बोन्साय ही अतिशय प्राचीन कला. या कलेविषयी असणारी उत्सुकता, त्याचे गैरसमज, जपानी बोन्साय कला कोल्हापूरकरांना समजून घेता आली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाचा विदेशी भाषा विभाग आणि कोल्हापूर बोन्साय क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'बोन्साय-एक कला जपानी' या कला कार्यशाळेचे.

विद्यापीठात बोन्साय कलेविषयी सखोल माहिती, बोन्साय कलेचे प्रात्यक्षिक, बोन्साय झाडांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. जपानमध्ये बोन्साय कलेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. ही कला मनःशांती आणि ध्यानधारणेसाठी अत्यंत उपयोगी आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ही कला जोपासता येते. यानंतर त्यांनी पीपीटीद्वारे बोन्साय कलेसाठी लागणारी कौशल्ये, उपकरणे, नवनवीन पद्धती, प्रकार याबद्दल कोल्हापूर बोन्साय क्लबच्या अध्यक्षा सुनिति देशमुख यांनी माहिती दिली. या कार्यशाळेमध्ये बोन्साय कलेची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. यामध्ये झाडांची निवड, त्याची काटछाट, बांधणी याबद्दल माहिती देण्यात आली. बोन्साय कलेचा अभ्यासक्रमामध्येही समावेश व्हावा, असे मत डॉ. धनश्री पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, कोल्हापूर बोन्साय क्लबचे सचिन बोंगाळे, दीपाली ताइवडे आणि विदेशी भाषा विभागाचे शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. सानिका डोईफोडे यांनी सूत्रसंचालन केले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात बोन्साय कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभाग आणि कोल्हापूर बोन्साय क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बोन्साय दिनानिमित्त बोन्साय- एक कला जपानी ही कला कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये बोन्साय कलेविषयी सखोल माहिती, बोन्साय कलेचे प्रात्यक्षिक, बोन्साय झाडांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी कोल्हापूर बोन्साय क्लबच्या अध्यक्षा सुनीती देशमुख यांनी पीपीटीद्वारे बोन्साय कलेसाठी लागणारी कौशल्ये, उपकरणे, नवनवीन पद्धती, प्रकार याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यशाळेमध्ये बोन्साय कलेची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.